

पुण्य नगरी
# आरोग्यजागर
| उत्तम आरोग्य | उज्ज्वल भविष्य | पुणे, मंगळवार, ८ सप्टेंबर २०१५



# मणक्याचा टीबी आणि होमिओपॅथिक उपचार






मणक्याचा टीबी आणि होमिओपॅथिक उपचार; (Pott's Disease)

टीबीचा म्हटला की, सर्वसामान्य माणसाला खोकून खोकून बेजार झालेला त्रास, ताप असलेला, वजन घटलेला दुर्बल माणूस डोळ्यांसमोर उभा राहतो. परंतु, काही टीबीचे रुग्ण खोकला हे सर्वसामान्य लक्षण न दर्शविता शरीरातील विविध अवयव उदा. किडनी, लहान आतडे, मानेच्या गाठी, मस्तिष्क आवरणचा टीबी तसेच हाडाचा टीबी यांसारख्या वेगवेगळ्या अवयवात शिरून या अवयवांच्या कार्यात अडथळा, झीज तयार करत तो अवयव होण्याइतपत प्रादुर्भाव निर्माण करतात.

Pott's Disease म्हणजे पाठीच्या कण्याचा क्षयरोग. क्षयरोग हा जगभर पसरत चाललेला एड्सनंतर मृत्यूचे कारण असलेला संसर्गजन्य आजार आहे. 'मायक्रोबॅक्टेरिझम ट्युबरक्युलॉसिस' जीवाणूमुळे क्षयरोग होतो. बाधित व्यक्तीच्या थुंकीद्वारे शिंकण्यातून हा आजार पसरतो. या जीवाणूंचे संक्रमण फुफ्फुसांमध्ये होते. जिथे हे जीवाणू द्विगुणित होतात. जीवाणूंनी हल्ला केल्यानंतर शरीरातील प्रतिकारपेशी या जीवाणूंना नष्ट करण्याचा प्रयत्न करतात. परंतु, या जीवाणूंभोवती असलेल्या आवरणामुळे हे जीवाणू द्विगुणित होतच राहतात. परिणामी फुफ्फुसातील वरच्या आणि खालच्या कप्प्यात दाह निर्माण होऊन जीवाणूपेशी आणि प्रतिकारपेशींचा गोळा (Granuloma) तयार होतो. या ग्रॅन्युलोमामधील निष्क्रिय जीवाणू कालांतराने पुन्हा पुन्हा क्रियाशील बनून पुन्हा क्षयरोगाची लक्षणे दाखवू शकतात किंवा कधीकधी या ग्रॅन्युलोमामधील पेशी मृत होऊन त्या ठिकाणी चीजसदृश पदार्थ तयार होतो. हे जीवाणू फुफ्फुसातील पेशींचा ऱ्हास करतात आणि रक्तप्रवाहात प्रवेश मिळवतात आणि संपूर्ण शरीरात क्षयरोगाचे संक्रमण करतात.

अशाचप्रकारे रक्तामार्फत पाठीच्या कण्यातील, छातीच्या पिंजऱ्याशी आणि कटिस्थळातील कण्यात क्षयरोगाच्या जीवाणूंचे संक्रमण होते. या कण्यातील मणक्यांमध्ये आणि त्यांमधील चकतींमधील पेशींचा ऱ्हास होऊन मृत पेशी आणि पू जमा होतो. मणक्याचे हाड खराब व ठिसूळ होते. त्यामुळे थोड्याशा धक्क्ययाने हाड मोडण्याची संभावना वाढते. तिथे चीजसदृश घट्टपणा येऊ लागतो. त्यामुळे मणका झिजत जाऊन आतल्या बाजूस कोसळतो. लहान मुलांमध्ये व वयात आलेल्या मुलांमध्ये या आजाराचे प्रमाण जास्त आहे. तसेच एच.आय.व्ही. पॉझिटिव्ह रुग्णांमध्ये हा आजार होण्याची संभावना तिपटीने जास्त असते.

या आजाराचा कालावधी ४ ते ११ महिन्यांचा असतो. दैनंदिन क्रिया करताना त्रास बळावल्यानंतर रुग्ण तपासण्या करतो. त्यामुळे या आजाराचे पटकन निदान होत नाही. परिणामी व्याधी वाढल्यानंतर उशिरा उपचार करण्यात येतात. दारिद्र्यरेषेखालील लोकांमध्ये, गर्दीच्या ठिकाणी, कुपोषित, व्यसनी लोकांमध्ये, मधुमेहाच्या रुग्णांमध्ये, एच.आय.व्ही. रुग्णांमध्ये, प्रतिकारक्षमता दाबणारी औषधे चालू असलेल्या लोकांमध्ये हा आजार होण्याची संभावना जास्त असते.

**लक्षणे :** १. सतत ताप येणे. २. रात्रीच्या वेळी घाम फुटणे. ३. अशक्तपणा जाणवणे. ४. वजन घटणे. ५. सतत अंगदुखी होणे. ६. पाठीत किंवा कंबरेत तीव्र वेदना होणे. त्या वेदना दोन्ही बाजूंच्या बरगड्यांमध्ये पसरणे. ७. हातापायात मुंग्या किंवा बधिरपणा जाणवणे. ८. हाडे ठिसूळ झाल्यामुळे पटकन मोडणे. ९. कंबरेच्या खालच्या लकवा मारणे त्यामुळे मल व मूत्र विसर्जनावरचा ताबा सुटणे. चालता न येणे. १०. संसर्ग झालेल्या मणक्याच्या ठिकाणावरील त्वचेवर गळवे तयार होणे. अशा गळव्यांचा मार्ग छातीच्या पिंजऱ्यात किंवा निलंबापर्यंत पोहचणे. ११. मणका ठासळल्यामुळे पाठीला बाक येणे.

**निदान :-** १. रक्ताच्या तपासणीत पांढऱ्या पेशींचे प्रमाण वाढलेले दिसून येते. तसेच ई.एस. आर. शंभरपेक्षा जास्त होतो. २. त्वचेची ट्युबरक्युलित टेस्ट ९० टक्के लोकांमध्ये पॉझिटिव्ह असते. ३. मणक्याचा एक्सरे आणि सी.टी., एम.आर.आय. स्कॅनद्वारे हाडाच्या बायॉप्सीतून या आजाराचे अचूक निदान होते.

**केस -**

ही एका ५५ वर्षांच्या पुरुषाची केस आहे. ज्याला पाठीच्या कण्याच्या क्षयरोगामुळे उभे राहायला, चालायला जमत नव्हते. या रोगामुळे त्याच्या हातापायाचे स्नायू कमकुवत व दुबळे झाले होते. या विकलांग अवस्थेत तो माझ्या दवाखान्यात भरती झाला.

**तक्रारी :-** १. सतत कंबर दुखणे. कंबरेत टोचल्यासारख्या असह्य वेदना होणे. त्याचबरोबर पायांमध्ये मुंग्या व बधिरपणा जाणवणे. त्यामुळे चालताना अडखळणे, पाय उचलून टाकता न येणे. २. सतत अंग दुखून ताप योणे. ३. जुनाट पित्ताचा त्रास २ ते ३ वर्षांपासून. ४. सतत तोंडाला पाणी सुटणे, मळमळणे. उलटी झाल्यावर बरे वाटणे. ५. अधूनमधून वरच्या तक्रारींबरोबरच डोकेदुखी व चक्करचा त्रास होणे.

**विशेष माहिती :-** १. खाण्यात तळलेल्या पदार्थांची, पालेभाज्यांची रुची तसेच माशांची नावड. २. कपाळावर पटकन खूप घाम येणे. ३. लघवीला जळजळणे. ४. शौचाला दोन ते तीन वेळा हिरवट असमाधानकारक होणे. ५. मारामारीची, भांडणाची स्वप्न पडणे.

**स्वभाव :- तुमचा स्वभाव कसा आहे?**

माझा स्वभाव तसा चिडखोर आहे. मला कुणी वेडवाकडं बोललेलं सहन होत नाही. मी ३० वर्षे झाली मुंबईमध्ये स्थायिक आहे. पूर्वी माझ्या भावाबरोबर मी मोठा व्यापार करत होतो. जिथे आमच्याच एका कामगाराने पैशांची अफरातफर केली. त्यानंतर माझे भावाशी भांडण झाले आणि मी गाव सोडून मुंबईला आलो. मी मुंबईला येऊन फळांचा व्यापार करू लागलो. माझ्या कुटुंबीयांबरोबर मी ५ ते ६ वर्षे झोपडीत काढली. नंतर एका राजकारण्याच्या मदतीने मला जागा मिळाली. पैशांची कशीबशी जुळवाजुळव करून मी मेहनतीने घर बांधले. पण, नंतर ते घरसुद्धा मुलीच्या लग्नासाठी मला विकावे लागले. नंतर मी पुन्हा एक घर विकत घेतले आणि वडापावचा व्यवसाय सुरू केला. मला सामाजिक कार्याची खूप आवड आहे. त्यामुळे माझे खूप शत्रू आहेत. त्यांनी मला अनेक वेळा त्रास दिला. माझा व्यवसाय व घर पाडण्याचा प्रयत्न केला. यात माझे जवळजवळ तीन लाखांचे नुकसान झाले. त्याविरुद्ध मी पोलिस चौकीत तक्रार नोंदवली आहे.

**तुम्ही काय सामाजिक कार्य करता?**

जर एखाद्या व्यक्तीला विनाकारण कुणी त्रास देत असेल तर त्यांच्यासाठी मी लढा देतो. मी लोकांना गोळा करून याविरुद्ध लढतो.

**तुम्हाला इतर काही ताणतणाव?**

माझ्या बायकोबद्दल मला संशय यायचा की तिचे कोणाबरोबर तरी वाईट संबंध आहेत. त्यामुळे मी सतत तिच्यावर लक्ष ठेवून होतो आणि एके दिवशी मी तिला रंगेहाथ पकडले आणि मला त्याचा मानसिक धक्का बसला.

**संपूर्ण व्यक्तिमत्त्व :-** १. थंड प्रकृती. २. चोखंदळपणा. ३. अन्याय सहन न होणे. ४. शिवीगाळ करण्याचा स्वभाव. ५. विरोध सहन न होणे. ६. संशयीवृत्ती. ७. व्यवसायाबद्दल चिंता. ८. बोलका स्वभाव. ९. सोबतीची गरज. १०. पोट साफ न होणे. ११. खाण्यात तेलकट पदार्थांची आवड. १२. पायांमध्ये बधिरपणा.

**प्रतिसाद :-** वरील सर्व माहितीद्वारे मी पेशंटला रुग्णालयात भरती करून घेतले आणि एकाच होमिओपॅथिक औषधाची मात्रा सुरू केली. औषध सुरू केल्यापासून पेशंटला पुन्हा ताप आला नाही. रात्रीची स्वस्थ झोप लागू लागली. हळूहळू काही दिवसांत पायातील मुंग्या येणे, बधिरपणा कमी झाला. पायांमध्ये ताकद येऊन दुर्बल झालेले स्नायू पूर्ववत व्यवस्थित झाले. कंबरदुखी कमी झाली. ॲडमिशननंतरच्या २१ व्या दिवशी मोठी गंमत झाली. मणक्याचा क्षयरोग असलेल्या पेशंटच्या वॉर्डमधील एक रुग्ण धावत धावत खाली आला. त्याच्या चेहऱ्यावर आनंद ओसांडून वाहत होता. हसत हसत तो म्हणाला, 'सर तुमचा पेशंट चक्क चालू लागला आणि तेही आधाराशिवाय!'

**पत्ता - आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल ॲण्ड फिलिंग सेंटर, तपोवन रोड, पिंपरी गाव, पुणे-१७. संपर्क - ०२०-६९३३७०८०, २७४१२५४९, २७४१२१९७**




**रोजच्या जेवणात पदार्थांची लज्जत वाढवण्याकरिता 'लोणच्यांचा' वापर हा आता नित्याचाच झाला आहे. आंबट-गोड, तिखट-तुरट अशी मिश्र चव असणारे हे लोणचे जीभेला जरी हवे-हवेसे वाटत असले तरी त्याचे सेवन हे अत्यंत मर्यादेत करणे आवश्यक ठरते.**

## आहारात लोणच्याचा समावेश मर्यादितच असावा



याला कारण म्हणजे यामध्ये मिठाचे प्रमाण हे अधिक असून, यामुळे शरिराच्या पचनसंस्थेवर अतिरिक्त ताण पडण्याची दाट शक्यता असते. मिठाच्या अतिरिक्त वापरामुळे शरिरातील पाणी बाहेर पडण्यास अडथळा निर्माण होत असतो. यामुळे अर्थातच किडनीवर अकारण ज्यादा ताण पडून शरिराचा रक्तदाब वाढण्याची दाट शक्यता असते. यामुळेच चवीला हवाहवासा वाटणारा हा पदार्थ मर्यादेमध्ये खाणे आवश्यक असते.

# रुबी हॉल व 'आयएमए'ला 'एफडीए'कडून नोटीस

**| पुणे : प्रतिनिधी**

रुग्णालयात असणाऱ्या औषध दुकानांव्यतिरिक्त बाहेरच्या औषध दुकानांमध्ये मिळणाऱ्या औषधांपैकी २५ टक्के औषधे ही बनावट असल्याचे वक्तव्य केल्याप्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने रुबी हॉल क्लिनिक आणि इंडियन मेडिकल असोसिएशनच्या पुणे विभागास नोटीस पाठवली आहे. राज्यात अशा प्रकारे बनावट औषधे कधीच आढळली नाहीत, त्यामुळे कोणताही विचार न करता अशा प्रकारचे मत चर्चासत्रात व्यक्त केल्याचे प्रकरण रुबी हॉल क्लिनिक आणि इंडियन मेडिकल असोसिएशनला चांगलेच महाग पडले आहे.

दोन्हीकडील प्रशासनाला याप्रकरणी त्वरित खुलासा मागवण्यात आला आहे. या विरोधात शहरातील औषध विक्रेत्यांची संघटनाही आक्रमक झाली आहे.

इंडियन मेडिकल असोसिएशनच्या गरिमा मंच व सजग नागरिक मंचाच्यावतीने दोन दिवसांपूर्वी एका चर्चासत्राचे आयोजन केले होते. या चर्चासत्रात रुबी हॉल क्लिनिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी बोमी भोटे यांनी रुणालयातील व रुग्णालयाबाहेरच्या औषध खरेदीबाबत बोलताना, बाहेरच्या औषधी दुकानांतील २५ टक्के औषधे बनावट असल्याने ती रुग्णांच्या प्रकृतीसाठी अपायकारक असल्याचे वक्तव्य केले होते. रुग्णालयाच्या फार्मसीमधूनच औषधांचा दर्जा चांगला राखण्यासाठी काळजी घेतली जाते. यासाठी काही खर्च येत असतो.

बाहेरच्या औषधी दुकानांमध्ये मात्र असे होत नसल्याचे चर्चासत्रात स्पष्ट केले होते.

# स्वाइन फ्लूचे एका दिवसात दोन बळी

## १७ जण अत्यवस्थ परिस्थिती चिंताजनक

**| पुणे : प्रतिनिधी**

शहरात व परिसरातील स्वाइन फ्लूची परिस्थिती गंभीर होत असून, आज एका दिवसात स्वाइन फ्लूमुळे दोन रुग्णांचा मृत्यू झाला आहे. परिणामी मृत्यू झालेल्या रुग्णांची संख्या १०७ वर पोहचली आहे. सध्या सरकारी व खासगी रुग्णालयात मिळून स्वाइन फ्लूची बाधा झालेले ३७ रुग्ण उपचार घेत आहेत. तसेच संशयित १२ जणांना निगरानीखाली ठेवण्यात आले असून १७ रुग्ण अत्यवस्थ आहेत.

स्वाइन फ्लूने मृत्यू झालेल्या रुग्णांपैकी एक शहरातील व दुसरा रुग्ण हा बाहेरून उपचारासाठी आला होता. परिणामी मृतांची संख्या एकूण १०७ झाली आहे.

त्यापैकी पालिका हद्दीतील ४०, तर बाहेरून उपचारासाठी आलेल्यांची संख्या ६७ वर पोहोचली आहे.

शहरातील विविध रुग्णालयांच्या २० वॉर्डांमध्ये १७ रुग्णांची स्थिती अत्यवस्थ असून, आज पुन्हा नव्याने सात संशयित रुग्णांची नोंद झाली आहे. पुणे महापालिकेची आणि शहरातील इतर खासगी रुग्णालयांतील मिळून आज एकूण १२३७ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी १५९ जणांना टॅमिफ्लूच्या गोळ्या देण्यात आल्या आहेत, तर २३ जणांचे स्वॅब म्हणजेच घशाचे द्रव तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यापैकी ७ रुग्ण हे पॉझिटिव्ह असून, १२ रुग्ण संशयित आहेत. आतापर्यंत स्वाइन फ्लूची ९४९ जणांना लागण झालेली असून, त्यापैकी ८०६ रुग्णांना घरी सोडण्यात आले आहे.

# सर्वसामान्य रुग्णांसाठी केवळ ५०० रुपयांत डायलिसिस

**| पुणे : प्रतिनिधी**

**पर्ल डायलिसिस सेंटरचे डॉ. संचेती यांच्या हस्ते उद्घाटन**

पुण्यात डायलिसिस रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे व त्याचा खर्च महिन्याला किमान २५ ते ३० हजार रुपये होतो. गरीब लोकांना हा श्रीमंत रोग मुळीच परवडण्यासारखा नाही. हे लक्षात घेऊन लायन्स परिवारातर्फे डॉ. अशोक अग्रवाल यांच्या ओम हॉस्पिटलच्या सहकार्याने शंकरशेठ रोडवरील अग्रवाल झेडवीएम हॉस्पिटल येथे हे सेंटर उभे केले. येथे सर्वसामान्य रुग्णांसाठी या सेंटरमध्ये केवळ ५०० रुपयांमध्ये डायलिसिसची सेवा पुरविण्यात येणार आहे. पर्ल डायलिसिस सेंटरचे अध्यक्ष रमेश शहा यांनी माहिती दिली.

लॉयन्स क्लब ऑफ पुणे पर्ल चॅरिटेबल ट्रस्ट व ओम हॉस्पिटलच्या सहकार्याने सुरू केलेल्या पर्ल डायलिसिस सेंटरचे उद्घाटन डॉ. कांतीलाल संचेती यांच्या हस्ते झाले. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पालकमंत्री गिरीश बापट उपस्थित होते. त्याच प्रमाणे लॉयन्स क्लबचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर श्रीकांत सोनी व पी.ए. इनामदार, चंद्रहास शेट्टी, धर्मेंद्र जैन हे उपस्थित होते.

# वाचवाल तर वाचाल



## पाणी गळती रोखा...!



पावसाने ओढ दिल्याने पाण्याची स्थिती गंभीर होणार आहे, शहरात आता एक दिवसाआड पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच पाणीगळती आणि चोरीवर करडी नजर ठेवण्याची गरज आहे. पुढील काळात पाऊस न झाल्यास पुणेकरांवर पाण्याचे मोठे संकट उभे राहू शकते यासाठी जलतरण तलाव, बांधकामांना पाणीपुरवठा होणार नाही, याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची गरज आहे. तरच पुढच्या काळातील गंभीर परिस्थितीला तोंड देता येणार आहे.

**| डॉ. सिद्धार्थ धेंडे**

**टीप :** शहरावर पाणी कपातीचे संकट उभे ठाकले आहे. यासाठी शहरवासीयांनी पाणी बचतीला प्राधान्य देणे गरजेचे आहे. तरी आपण कशा पध्दतीने पाणी बचत कराल याची माहिती फोटोसह पुण्यनगरीला पाठवावी.

पत्ता : दैनिक 'पुण्य नगरी' बहिरट पाटील आर्केड, दुसरा मजला, बालगंधर्व चौक, शिवाजीनगर, पुणे - ५. Email : ambika.pune@gmail.com

## शब्दनगरी

मंगळवार, ०८ सप्टेंबर २०१५ — पुण्य नगरी — शब्दनगरी



### आडवे शब्द

१. कृष्ण भक्तीचा महिमा सांगणारे प. बंगालमधील एक थोर संत
७. गुजरातमधील एक थोर कृष्ण भक्त व गुजराती भाषेतील आद्य कवी
१३. फायदा, लाभ
१४. मोठे, शिडाचे जहाज, तारु
१५. एक जुने मराठी भावगीत गायक
१७. आचारी, स्वयंपाकी (हिंदी)
१८. पु.ल. देशापांडे यांची एक विनोदी साहित्यकृती बटाट्याची **
१९. खायला काळ भुईला **
२०. अक्षरापुढील 'आ' या स्वराचे चिन्ह, तिरळा
२१. जय, सरशी, सफलता
२२. 'स्वर्ग'च्या विरुद्ध, नरक (इंग्रजी)
२३. पाठलाग, पिच्छा पुरवणे
२६. देवाच्या नावाचे पुन्हा पुन्हा उच्चारण, नामस्मरण
२७. लग्नात करवलीच्या हातात असतो तो मंगल कलश
२८. झाडाचे पर्ण, दल
३०. आरोप, संशय (उर्दू)
३१. पात्र नसलेला, नालायक
३२. 'सुखांशी भांडतो आम्ही', 'देहभान' या नाटकांचा लेखक
३६. अकस्मात, एकाएकी
३७. कर्नाटक राज्याची भाषा
३८. निर्णय, निवाडा, खटल्याचा सोक्षमोक्ष
३९. सर्व्हिस टॅक्स (मराठी)
४१. इंग्रजीत 'मध'
४२. आजच्या अगोदरचा दिवस
४३. भाग्य, दैव
४४. विषय, मुद्दा, मामला
४६. रावणाची पत्नी
४९. लिंबू-पाण्याचे गोड पेय
५१. बंगाली मिठाईचा एक प्रकार
५३. अरबाज खानचा एक चित्रपट
५४. जुने अर्ध्या कोसाचे रस्त्याचे माप
५५. पोस्टमन (हिंदी)
५८. टेलिग्राम (मराठी)
५९. तीव्र दुःख, यातना, कळ
६१. कांती, लकाकी, प्रकाश, तीव्रता
६३. हाक, हाकेस उत्तर, बोलावणे
६४. अवकाशातील वस्तूंचे स्थान व दिशा दाखविणारे यंत्र
६६. सुवासिनी, सवाष्ण
६८. माया, ममता, मर्म, जिवंत झरा
६९. डंका, नौबत
७१. घट्ट, घन, गडद
७२. बैलाच्या शिंगांना बांधण्याची दोरी
७४. 'हा' गोड लागला म्हणून मुळासकट खाऊ नये
७६. चित्रपटाचा रुपेरी पडदा
७९. काळ्या लाकडाचे एक टिकाऊ झाड
८१. बेताचा, योग्य, मध्यम
८३. हिंदीत 'हिरवा'
८५. दुकानात माल मापून देणारा
८६. स्व. संजय गांधी यांचा पुत्र व भाजपाचे एक खासदार
८७. अदालत, कोर्ट
८८. साठ मिनिटांचा कालावधी

### उभे शब्द

१. ऐषआराम, मौजमजा
२. फरक, अंतर (उर्दू)
३. नंतर, थोड्या वेळाने
४. चळवळ, चलनवलन
५. फार शक्तिमान, बलाढ्य
६. पिशाच्च, राम गोपाल वर्माचा एक चित्रपट
७. नगरपालिकेचे सभासद
८. सुट्टी
९. दृश्य, देखावा (इंग्रजी)
१०. विश्वामित्राचा तपोभंग करणारी अप्सरा
११. क्युबा देशाची राजधानी
१२. भोजन वाढण्याचे पात्र, थाळी
१६. टाइमटेबल (मराठी)
१९. भ्रम, भ्रांती, कल्पना, समज
२२. कमल हसनचा एक चित्रपट
२४. इंग्लिश खाडी पोहून जाणारा भारतीय जलतरणपटू
२५. सीतेचा पती, रघुनंदन
२६. टोकियो राजधानी असलेला उगवत्या सूर्याचा देश
२७. सातारा जिल्ह्यातील एक मोठे शहर व एक तालुका
२८. हरिणीचे पिल्लू
२९. नकला करणारा, नकल्या
३१. हिंदीत 'लोणचे'
३२. जितेंद्रचा एक चित्रपट, बुद्धिमान
३३. निराळा, वेगळा
३४. एक चित्रपट जय तुळजा ***
३५. आशय, हेतू, अर्थ, स्वार्थ (हिंदी)
३६. एक चित्रपट अमर **** अँथनी
४०. नवी मुंबईतील एक मुख्य शहर
४१. अडला ** गाढवाचे पाय धरी
४४. झुरळ
४५. क्रिकेटची बॅट (हिंदी)
४७. धागा, सूत
४८. अस्वलाचा खेळ करणारा
४९. शल्य, दुःख, मनातील बोचणी
५०. काचेला पडलेला चीर, भेग
५२. एक तंतूवाद्य
५४. राघूची जोडीदारीण
५६. हिंदीत 'शेतकरी'
५७. लक्षात राहण्याजोगे, स्मरणीय
६०. जोराचा धक्का, प्रहार, तडाखा
६१. त्या वेळी
६२. जाळण्यास योग्य, जळणारे
६५. विहिरीतून पाणी काढण्याचे चक्रयंत्र
६६. एकटा जीव ****
६७. पांथस्थ, मुसाफिर
६८. लांब मानेचा एक उंच प्राणी
७०. राजाची आई
७३. धर्मेंद्र व आशा पारेख यांचा एक चित्रपट
७५. मौजेने फिरणे, ट्रीप, पिकनिक
७७. शोध, चौकशी, माग
७८. बालकथेतील पंख असलेली काल्पनिक स्त्री
८०. जखमेची शरीरावरील खूण, व्रण, माव
८२. मुलगी, पुत्री
८४. एक हिंदी अभिनेत्री ऐश्वर्या **
८९. इंग्रजी वर्षाचा पाचवा महिना

### कालच्या शब्दनगरीचे उत्तर

